# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## गुन्हे शाखा युनिट 3 ची कामगिरी
## सराईत गुन्हेगाराने चोरलेल्या वीस लाख पन्नास हजार रुपयाच्या 15 बुलेट / मोटर सायकली हस्तगत

पिंपरी चिंचवड शहरात मध्ये बुलेट मोटर सायकलचोरीचे प्रमाणदिवसेंदिवस वाढलेले होते नमुद प्रकारचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठीमा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधीर हिरेमठ यांनी सर्व गुन्हे शाखेतील अधिकारी यांनासुचनादिलेल्या होत्या त्याप्रमाणेगुन्हे शाखा युनिट 3 येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी बुलेट चोरीकार्यप्रणालीवर लक्ष केंद्रीतकरुनचोरीझालेल्या घटनास्थळावरील परीसरातील संपुर्ण सीसीटीव्ही फुटेज व सदर घटनास्थळावरील तांत्रिक विश्लेषण करुनत्यामध्ये रेकॉर्डवरील गुन्हेगार अमोल शिवाजी ढोबळे रा.घाटकोपर मुंबई हा बुलेट मोटर सायकलचोरीकरीत असलेचेदिसून आले. तसेचत्याचेइतर साथीदार यांची पुर्ण माहीती संकलितकेली व त्यांचेवर लक्ष केंद्रीतकेले.

दिनांक 24/01/2021 रोजी गुन्हे शाखा,युनिट 3 कडील पोलीस उपनिरीक्षक प्रसन्न जऱ्हाड, गिरीशचामले पोलीस उपनिरीक्षक हे स्टाफसह खाजगी वाहनाने चाकण पोलीस ठाणेचे हददीत वाहन चोरी प्रतिबंधात्मक पेट्रोलिंगकरीत असताना पो.शि. प्रमोदढाकणे व पो.शि.योगेश्वरकोळेकर यांनात्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अमोल ढोबळे याचेदोन साथीदार विशाल खैरे व विशाल मगर रा.जामखेड जि.अहमदनगर हे मोशी टोलनाका परीसरामध्ये अमोल ढोबळे यानेचोरलेली बुलेट मोटर सायकलघेवून मोशी टोलनाका परीसरामध्येविक्रीकरण्याकरीता येणार आहेत.अशी खात्रीशीर बातमी मिळाली असता वरीष्ठ पोलीसनिरीक्षक शंकर बाबर यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व पोलीस स्टाफसह मोशी टोलनाका येथे सापळा रचुन बातमीतील संशयीतदोनइसम1) विशाल बाळासाहेब मगर, वय 20 वर्षे, रा.लेहणेवाडी,ता.जामखेड, जि.अहमदनगर 2) विशाल बंकट खैरे, वय 21 वर्षे, रा. भुतडाता.जामखेड, जि.अहमदनगर यांनाचोरीच्या बुलेटसह ताब्यातघेतलेत्यांचेवर सीआरपीसी 41(1) (ड) प्रमाणेकारवाई करुनत्यांचेकडे कौशल्यपुर्ण अधिकतपास केला असता सदरचे बुलेट मोटर सायकल हीत्यांचामित्र अमोल ढोबळे यानेचोरीकरुनत्यांनाविक्रीकरीतादिले बाबतकबुलीदिलीतसेच अमोल ढोबळे याने 12 बुलेट मोटर सायकल वइतर 02 मोटर सायकलजामखेड येथेविक्रीकरीता ठेवले बाबत सांगितले. जामखेड येथेदोनतपास पथके रवानाकरुनत्या पथकाने 12 बुलेट व 02 मोटर सायकल अशी एकुण 14 वाहने तेथून जप्तकरुन आणण्यात आली आहेत. नमुद दोन्ही आरोपीकडूनपिंपरीचिंचवड, पुणे जिल्हा,नवी मुंबई, ठाणे परीसरातुनचोरुन आणुनविक्रीकरीता ठवलेल्या 13 बुलेट मोटर सायकल व 01 अपाची मोटर सायकल,01 ॲक्टीवा मोपेड अशा एकुण 20,50,000/- रुपयेकिंमतीच्या15 मोटर सायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. बुलेट मोटर सायकलचोरीतील पाहीजे आरोपी अमोल शिवाजी ढोबळे रा.पंतनगर, घाटकोपर, इस्ट, मुंबई याचा पथका मार्फत शोध चालु आहे.

सदर बुलेट मोटर सायकली बाबत पिंपरीचिंचवड आयुक्तालय, पुणेग्रामीण, नवी मुंबई, ठाणे येथूनचो-या केल्या असूनत्या संदर्भात खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

पिंपरीचिंचवड पोलीस आयुक्तालय हददीतील चाकण पोलीस ठाणे 02, भोसरीएमआयडीसी पोलीस ठाणे 02, भोसरी पोलीस ठाणे 01, पिंपरी पोलीस ठाणे 01, हिंजवडी पोलीस ठाणे 01 पुणेग्रामीण हददीतील राजगड पोलीस ठाणे 02, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हददीतील नेरळ पोलीस ठाणे 01, एपीएमसी पोलीस ठाणे 01,रबाळे पोलीस ठाणे 01, ठाणे शहर हददीतील कापुरबावडी पोलीस ठाणे 01 प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

यातील आरोपी अ.नं. 1 विशाल बाळासाहेब मगर, वय 20 वर्षे, रा.लेहणेवाडी,ता.जामखेड, जि.अहमदनगर याचेवर यापुर्वी जामखेड अ.नगर येथे फायरींगकरुनजिवे ठार मारण्याचा प्रयत्नकेला म्हणून जामखेड पोलीस ठाणे गु.र.नं.81/2020 भा.दं.वि.कलम 307,323,504,506,34 प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**सदरचीकारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधिर हिरेमठ, मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.आर.आर. पाटील, मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) श्रीमती प्रेरणाकटटे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीसनिरीक्षक शंकर बाबर, पोलीस उपनिरीक्षक प्रसन्न ज-हाड, पोलीस उप निरीक्षकगिरीशचामले, हजरत पठाण, यदु आढारी,सचिन मोरे,विठठल सानप, गंगाधर चव्हाण, योगेश्वर कोळेकर,नाथाकेकान राजकुमार हनमंते, सागरजैनक, त्रिनयन बाळसराफ, शशिकांतनांगरे, राहुल सुर्यवंशी, प्रमोदढाकणे, जगदीश बुधवंत व गजानन आगलावे यांनी केली आहे.**

